THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 22ND AUGUST 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

सन १८९५ चा नंबर ३२५७.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख १ माहे मे सन १८९५.

"सर्व प्रकारचे स्टांप, ह्मणजे, सन १८७९ चा स्टांप आक्ट याअन्वयें द्यावयाच्या ड्यूटी दर्शविण्याकरितां उपयोग करावयाचे सामान्य स्टांप; सन १८७० चा कोर्टाचे फीचा आक्ट याअन्वयें द्यावयाच्या फी दर्शविण्याकरितां उपयोग करावयाचे कोर्टफी स्टांप; तारहंशिलाचे स्टांप आणि टपालहंशिलाचे स्टांप, हे सांभाळून ठेवणें, पुरविणें व विकणें यांबावदच्या कानू.

सेन्ट्रल* डिपो.

१. कलकत्ता, मद्रास, व मुंबई, येथील स्टांपांचे सुपरिंटेंडंट यांपैकीं दरेकाच्या स्वाधीन सर्व प्रकारच्या स्टांपांसाठीं एकेक सेन्ट्रल डिपो असेल. ह्या सेन्ट्रल डिपोंनीं दोन वर्षांच्या खर्चाला पुरत इतके स्टांप दास्तानांत राखले पाहिजेत. मद्रासेंतील व मुंबईंतील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटांनीं, ह्या कारणासाठीं, दरसाल, निदान सप्टेंबर महिन्यांतील शेवटल्या आठवड्यांत, त्यांकडून ज्या मुलुकांला स्टांप पुरविण्यांत येत असतील त्या मुलुकांकरितां पुढल्या सालांत जे निरनिराळ्या प्रकारचे स्टांप पाहिजे असतील त्यांच्या पुरवठ्यासाठीं, कलकत्ता येथिल स्टांपांच्या सुपरिंटेंडंटाकडे इन्डेंटें† पाठविलीं पाहिजेत. कलकत्ता येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटानें सर्व प्रकारच्या स्टांपांबद्दल एक एकंदर सामान्य इन्डेंट तयार करून त्यांत तीन इलाक्यांपैकीं प्रत्येक इलाक्याबदल पुढल्या सालासाठीं स्टांपांचा जेवढा खप असेल तो निरनिराळा दर्शविला पाहिजे, व त्यांत मद्रास व मुंबई येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटांचीं इन्डेंटें सामिल केलीं पाहिजेत; आणि त्यानें हें सामान्य इन्डेंट दरसाल निदान नोव्हेंबर महिन्याच्या १ ल्या तारिखेस सेक्रेटरी आफ् स्टेट यांस पोहंचेल अशा बेतानें तें त्यांकडे पाठविण्यासाठीं हिंदुस्थान सरकारच्या फिनान्स डिपार्टमेंटांत पाठविलें पाहिजे. सदरहू सुपरिंटेंडंटानें सदरहू सामान्य इन्डेंटांतील टपाल हंशिलाच्या स्टांपांबाबदच्या भागाची एक प्रत पोस्ट आफीसचे डरेक्टर जनरल यांकडे पाठवावी; आणि तारहंशिलाच्या स्टांपांबाबदच्या भागाची एक प्रत टेलिग्राफांचे डरेक्टर जनरल यांकडे पाठवावी.

---

* मुख्य. † इन्डेंट=मागणीपत्रक.

२. वायव्य प्रांत व अयोध्या, पंजाब, मध्य हिंदुस्थान, राजपुताना, आसाम व ब्रह्मदेश, आणि कलकत्याच्या ताब्यांतील लोकल* डिपो यांसुद्धा बंगाल इलाक्याकरितां लागणारे स्टांप, आणि मध्य प्रांतांत उपयोगासाठीं लागणाऱ्या नकलांकरितां जरूर असणारे स्टांप, हे लोकल डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारांच्या इन्डेंटावरून कलकत्ता येथील सेंट्रल डिपोंतून पुरविले जातील.

३. कुर्ग व मद्रासच्या ताब्यांतील लोकल डिपो यांसुद्धा मद्रास इलाक्याकरितां लागणारे स्टांप, लोकल डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारांच्या इन्डेंटावरून मद्रास येथील सेंट्रल डिपोंतून पुरविले जातील.

४. सिंध, वऱ्हाड, (२ ऱ्या कानूंत ठरविलें आहे तें खेरीज करून) मध्य प्रांत, व मुंबईच्या ताब्यांतील लोकल डिपो यांसुद्धा मुंबई इलाक्याकरितां लागणारे स्टांप, लोकल डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारांच्या इन्डेंटावरून मुंबई येथील सेंट्रल डिपोंतून पुरविले जातील.

५. कलकत्ता, मद्रास व मुंबई येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटांनीं, कोणत्याही लोकल डिपोकडून इन्डेंट आल्यावर, त्यावरून त्या डिपोला स्टांपांचा योग्य पुरवठा खात्रीपूर्वक होण्यासारखा आहे हें पाहण्या-साठीं तें तपासविलें पाहिजे, आणि त्यांस योग्य वाटेल त्याप्रमाणें त्यांतील मागणी पूर्णपणें किंवा अंशतः कबूल करण्याचा त्यांस अधिकार आहे. त्यांतील मागणी वाढविली पाहिजे असें त्यांस वाटेल तर, ज्या अमलदारानें तें इन्डेंट पाठविलें असेल त्यास त्यांनीं पुरवणी इन्डेंट पाठविण्यास सांगावें. कलकत्ता, मद्रास व मुंबई येथील प्रेसिडेन्सी पोस्ट आफिसांला स्टांपांच्या पुरवठ्यांसाठीं सेंट्रल डिपोंकडे इन्डेंट पाठ-विण्याचा अधिकार आहे.

## लोकल डिपो.

६. पोलिटिकल व साल्ट एजन्सींकडील ट्रेझऱ्यांसुद्धा सर्व हिंदुस्तानांतील दरेक ट्रेझरी ही, सर्व प्रकारचे स्टांप सांभाळून ठेवण्याकरितां व विकण्याकरितां लोकल डिपो आहे असें समजावें. ज्या ठिकाणीं ट्रेझरी नसेल तेथें लोकल डिपो स्थापण्याचा स्थानिक सरकारांस अधिकार आहे.

७. स्थानिक सरकारानें इतर रीतीनें फर्माविलें नसेल, तर दरेक लोकल डिपोनें, अजमासें पांच महिन्यांच्या खर्चाला पुरत इतक्या स्टांपांचा पुरवठा राखला पाहिजे. स्थानिक सरकारांस असें फर्माविण्याचा अधिकार आहे कीं, साधारणतः किंवा कोणत्याही विशेष प्रकारच्या स्टांपांसंबंधी किंवा कांहीं लोकल डिपोंमध्यें राखावयाचा पुरवठा, त्यांस योग्य वाटेल तशा दुसऱ्या कोणत्याही मुदतींत अजमासें होणाऱ्या खर्चाला पुरे इतका असावा.

८. जेव्हां लोकल डिपोंतील स्टांपांची संख्या, गेल्या सहा महिन्यांमध्यें त्या डिपोंतून दिलेल्या स्टांपांच्या संख्येखालीं जाईल, तेव्हां लगेच ती डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें अजमासें तीन महि-न्यांच्या खर्चाला पुरत इतक्या स्टांपांच्या पुरवठ्याबद्दल इन्डेंट तयार केलें पाहिजे. ह्या इन्डेंटांत, ज्या स्टां-पांचा पुरवठा पाहिजे असेल तशा दरेक जातीच्या स्टांपांबद्दल निरनिराळ्या कोष्टकांमध्यें, त्या लोकल डि-पोंतील व तिच्या ताब्यांत असणाऱ्या कोणत्याही ब्रांच † डिपोंमधील एकंदर शिल्लक, गेल्या साहा महिन्यांमध्यें किती स्टांप विकले तें, आणि किती स्टांपांबद्दल मागणी केली आहे तें दाखविलें पाहिजे: ह्या मागणीचें मान गेल्या साहा महिन्यांमध्यें विकलेल्या स्टांपांच्या जवळ जवळ अर्ध्यानें असावें. ह्या कानूंत सांगितलेल्या "सहा महिन्यांच्या" व "तीन महिन्यांच्या" मुदती, ७ ऱ्या कानूंतील पांच महिन्यांच्या मुदती-प्रमाणें बदलून आपणांस योग्य वाटतील तशा दुसऱ्या मुदती फर्माविण्याचा स्थानिक सरकारांस अधिकार आहे. हें इन्डेंट, प्रसंगाप्रमाणें, मद्रास, मुंबई किंवा कलकत्ता येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटाकडे परभारें पाठवावें; परंतु कोणत्याही प्रांताच्या स्थानिक सरकारास, असें इन्डेंट दुसऱ्या कोणत्याही अमलदारामार्फत, उदाहरणार्थ त्या प्रांताच्या स्टांपांच्या सुपरिंटेंडंटामार्फत पाठविलें पाहिजे, किंवा त्या इन्डेंटाची एक प्रत अशा अमलदारास पाठविली पाहिजे, असें फर्माविण्याचा अधिकार आहे.

* लोकल=स्थानिक.

† स्टांपांच्या शिलकांचा तपशील दर्शविणारें नियमित मुदतीनें यावयाचें शेवटचें पत्रक स्थानिक डिपोस आलें असेल त्यांतील आंकड्यांचा, ब्रांच डिपोंकरितां दरेक कोष्टकांत दाखवावयाची एकंदर शिल्लक गणतांना उपयोग केला असतां चालेल.

९. जर एकाद्या लोकल डिपोंतील स्टांपांचा पुरवठा सेन्ट्रल डिपोंतून स्टांप येण्यापूर्वी कमी होईल, तर ती लोकल डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें एकाद्या जवळील डिपोला स्टांपांकरितां इन्डेंट पाठवावें, व त्या इन्डेंटाची एक प्रत प्रांताच्या स्टांपांच्या सुपरिंटेंडंटास किंवा कमिशनरास, किंवा स्थानिक सरकार फर्मावील तशा दुसऱ्या अमलदारास पाठवावी. कोणत्याही प्रसंगीं कोणत्याही लोकल डिपोंतील कोणत्याही प्रकारच्या स्टांपांचा सांठा ठरविलेल्या मानाखालीं गेल्याचें मद्रास, मुंबई, किंवा कलकत्ता येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटास समजलें असतां त्याबद्दल, सामान्य व कोर्ट फी स्टांपांच्या बाबतींत स्थानिक सरकारास (किंवा स्थानिक सरकार फर्मावील तशा अधिकाऱ्यास), टपाल हंशिलाच्या स्टांपांच्या बाबतींत पोस्ट आफीसच्या डरेक्टर जनरलास, आणि तार हंशिलाच्या स्टांपांच्या बाबतींत टेलिग्राफांच्या डरेक्टर जनरलास रिपोर्ट करणें हें अशा सुपरिंटेंडंटाचें काम आहे.

१०. सेन्ट्रल डिपोंतून किंवा दुसऱ्या लोकल डिपोंतून स्टांपांचा पुरवठा आल्यानंतर होईल तितक्या लवकर लोकल डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें आलेल्या पेट्या किंवा पाकिटें आपल्या समक्ष उघडविलीं पाहिजेत. आणि तीं उघडल्यानंतर लगेच दरेक पेटींतील किंवा पाकिटांतील स्टांप त्यानें जातीनें मोजले पाहिजेत किंवा आपल्या समक्ष मोजविले पाहिजेत. लोकल डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें आलेल्या स्टांपांची संख्या पाठविलेल्या इन्व्हाइसबरोबर रुजू घेतली पाहिजे, आणि ज्या अमलदारानें हे स्टांप पाठविले असतील त्यास होईल तितक्या लवकर पावती पाठविली पाहिजे.

११. लोकल डिपोमध्यें आलेले स्टांप तपशीलवार मोजण्यासंबंधीं, आणि अशी डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें स्वतः आपल्या हातानें कोणत्या प्रकारचे स्टांप मोजले पाहिजेत यासंबंधीं जरूर वाटतील तसे हुकूम फर्माविण्याचा स्थानिक सरकारांस अधिकार आहे. अशा हुकुमांमध्यें, ज्या मोहरबंद पाकिटांवर आंत स्टांपांची अमुक संख्या आहे ह्मणून दर्शविलेलें असेल त्यांपैकीं शेंकडा अमुक पाकिटें मात्र तीं आल्यावेळीं उघडून मोजावीं, आणि याप्रमाणें उघडलेलीं पाकिटें सर्व बरोबर आहेत असें आढळल्यास, बाकीचीं पाकिटें मोहर न फोडतां ठेवावीं आणि जरूर लागेल त्याप्रमाणें दोन कुलुपांमधून काढून दिल्यावर त्यांतील स्टांप मोजावे, असे नियम दाखल करण्याचाही अधिकार आहे. असे कोणतेही नियम पाळले जाण्याबद्दल आणि पावतीवर सही करण्यापूर्वी आलेल्या स्टांपांच्या संख्येविषयीं आपली खात्री करून घेण्याबद्दल लोकल डिपो स्वाधीन असणारा अमलदार जवाबदार आहे.

१२. आलेल्या स्टांपांपैकीं कोणतेही स्टांप देण्यालायक नाहींत असें आढळल्यास, ते एकदम स्टांपांच्या सुपरिंटेंडंटाकडे परत पाठवावे. जे कोणतेही स्टांप आल्यानंतर कोणत्याही वेळीं कोणत्याही अपायामुळें देण्याला नालायक होतील, ते त्याचप्रमाणें, ते नालायक झाल्याचें समजल्याबरोबर अशा सुपरिंटेंडंटाकडे परत पाठवावे. याप्रमाणें परत पाठविलेल्या स्टांपांबद्दल माही पत्रक ( कानू ३४ ), आणि प्लस व मैनस यादी ( कानू ३६ ), यांमध्यें जी कोणतीही नोंद करणें जरूर होईल ती करावी.

१३. आलेले स्टांप मोजल्यानंतर लगेच ते पार्सलांमध्यें किंवा पाकिटांमध्यें घालून दोन कुलुपांमध्यें दास्तानांत योग्य पात्रांत ठेविले पाहिजेत व अशा दरेक पार्सलांतील किंवा पाकिटांतील स्टांपांची संख्या माहीत असली पाहिजे, आणि प्रत्येक जातीच्या स्टांपांची रकम, दोन कुलुपांतील दास्तानांत आलेले व त्यांतून दिलेले स्टांप दर्शविण्याकरितां ठेवावयाच्या रजिष्टरांत नमूद केली पाहिजे.

१४. ट्रेझरर, किंवा स्थानिक सरकार फर्मावील तसा दुसरा अमलदार हा हुद्द्याच्या नात्यानें, दरेक लोकल डिपोंतील सर्व प्रकारच्या स्टांपांचा वेंडर आहे असें समजावें. लोकांस किंवा लेसनदार वेंडरांस, खुद्द दोन कुलुपांतील दास्तानांतून स्टांप विकावयाचे नाहींत, त्यांला विकण्याकरितां पुढील कानूमध्यें सांगितल्याप्रमाणें, हुद्द्याच्या नात्यानें असणाऱ्या वेंडराच्या हवालीं एका कुलुपांत ठेवण्याकरितां जो स्टांपांचा पुरवठा दिला असेल, त्यांतून त्यानें त्यांला स्टांप विकले पाहिजेत.

१५. जो स्टांपांचा सांठा हुद्द्याच्या नात्यानें असणाऱ्या वेंडराच्या स्वाधीन करावयाचा व जो त्यानें एका कुलुपांत ठेवावयाचा तो साधारणतः, अजमासें एक महिन्याच्या खपाला पुरे इतका असला पाहिजे. दरेक महिन्याच्या प्रारंभीं एका ठरीव तारखेस हुद्द्याच्या नात्याच्या वेंडरानें त्या महिन्याकरितां लागणाऱ्या स्टां-

पांबद्दल एका नमुन्याप्रमाणें एक इन्डेंट तयार करून त्यांत, आपल्या हातीं असलेली शिलक, सरासरीनें एका महिन्यांत होणारा खर्च, व जितक्या स्टांपांची जरुरी असेल तितके स्टांप, हीं नमूद केलीं पाहिजेत. जेव्हां हें इन्डेंट लोकल डिपो स्वाधीन असणारा अमलदार, एका कुलुपांतील शिलक तपासून, व तेथील दाखविलेल्या स्टांपांचा इन्डेंटांत दाखविलेल्या स्टांपांशीं मेळ बसतो अशी आपली खातरी करून घेऊन, पसंत करील, तेव्हां त्यानें जरूर असणारा स्टांपांचा पुरवठा दोन कुलुपांतील दास्तानांतून काढून दिला पाहिजे. दर्म्यानच्या कोणत्याही तारखेस कोणत्याही स्टांपांची जरुरी लागली तर सदरीलप्रमाणेंच काम चालविलें पाहिजे. जर स्थानिक सरकारांस, ट्रेझररच्या तारणाच्या रकमेच्या संबंधानें किंवा इतर कोणत्याही कारणानें, ह्या कानूंत सांगितलेली एक महिन्याची मुदत कमी करून एका आठवड्याची किंवा महिन्याहून कमी अशी दुसरी कोणतीही मुदत ठरविणें इष्ट वाटेल, तर तसें करण्याचा त्या सरकारांस अधिकार आहे.

१६. याप्रमाणें हुद्द्याच्या नात्यानें असणाऱ्या वेंडराच्या स्वाधीन केलेल्या व त्यानें एका कुलुपांत ठेवलेल्या सांठ्यांतून त्यानें लोकांस व लेसनदार वेंडरांस रोख पैसा घेऊन स्टांप विकले पाहिजेत. त्यानें स्थानिक सरकार फर्मावील त्या भाषेंत, सदरहू चार प्रकारच्या स्टांपांपैकीं दरेक प्रकारच्या स्टांपांच्या रोजच्या विक्रीचा हिशोब एका नमुन्याप्रमाणें ठेवला पाहिजे. ह्या हिशोबांत दरेक जातीचे स्टांप आपल्या हातीं दिवसाच्या सुरुवातीस किती शिलक होते तें, दिवसामध्यें किती विकले तें, आणि दिवस अखेरीस आपल्या हातीं किती शिलक राहिले तें नमूद केलें पाहिजे. त्यानें, विकलेल्या स्टांपांबद्दल आपणाकडे आलेली रोकड ट्रेझरींत रोज भरली पाहिजे, ती अशी कीं सदरहू चार प्रकारच्या स्टांपांपैकीं—ह्मणजे सामान्य, कोर्टफीचे, टपाल हंशिलाचे, व तार हंशिलाचे—यांपैकीं दरेक प्रकारच्या स्टांपांबद्दल उत्पन्न झालेली रकम निरनिराळी भरली पाहिजे. रोजच्या विक्रीचा हिशोब सदरहू डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें दररोज पाहिला पाहिजे.

१७. सामान्य व कोर्टफीचे स्टांप विकण्याबद्दल लेसनदार वेंडरांस वर्तवळा व लेसनें देणें यांबाबदच्या कानूंमध्यें निरनिराळ्या प्रांतांत फरक असून, त्या कानू स्थानिक सरकारांनीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांच्या पूर्व मंजुरीवांचून वर्तवळ्याच्या दरांमध्यें कोणताच फेरफार करावयाचा नाहीं, ह्या सामान्य नियमास पात्र करून ठरविल्या आहेत.

१८. हुद्द्याच्या नात्याच्या वेंडरांनीं लोकांस सामान्य व कोर्टफीचे स्टांप विकावयाचे ते फक्त, अमुक एका ठरीव रकमेवरच्या किंमतीचेच विकावे, व त्याहून कमी किंमतीचे स्टांप लोकांस लेसनदार वेंडरांनीं विकावे, असें फर्माविण्याचा स्थानिक सरकारांस अधिकार आहे.

१९. हुद्द्याच्या नात्याच्या वेंडरांनीं लोकांस तार हंशिलाचे स्टांप रोख पैसा घेऊन विकले पाहिजेत, मात्र एका मनुष्यास एका वेळीं विकलेले स्टांप ९ रुपयांहून कमी किंमतीचे असूं नयेत, आणि विकलेल्या स्टांपांमध्यें कोणत्याहि जातीचे स्टांप एका रुपयाहून कमी किंमतीचे असूं नयेत. अशा स्टांपांच्या विक्रीवर वर्तवळा मिळणार नाहीं.

२०. टेलिग्राफ मास्तरांस, एका वेळीं दिलेल्या स्टांपांच्या संबंधानें गेल्या कानूंत ज्या शर्ती सांगितल्या आहेत त्याच शर्तींवर, तार हंशिलाच्या स्टांपांचे पुरवठे लोकल डिपोंमधून मिळतील, आणि त्यांनीं लोकांस कोणत्याही प्रकारचे व कोणत्याही किंमतीपर्यंत तार हंशिलाचे स्टांप विकले पाहिजेत. टेलिग्राफ मास्तरांस स्टांप विकण्याबद्दल वर्तवळा मिळणार नाहीं; परंतु त्यांला पैसा न भरतां तार हंशिलाच्या स्टांपांचे कायमचे अगाऊ पुरवठे मिळतील. ह्या कायमच्या अगाऊ पुरवठ्यांचें मान टेलिग्राफांचे डरेक्टर जनरल यांजकडून ठरविलें जाईल. तार हंशिलाच्या स्टांपांचा कायमचा अगाऊ पुरवठा एकदां घेतला ह्मणजे, टेलिग्राफ मास्तरांस पुढें स्टांप लागल्यास ते फक्त रोख पैसा भरला असतां मात्र देण्यांत येतील. परंतु जेव्हां लोकल डिपो एका दिवसाहून जास्त मुदतीच्या सणानिमित्त बंद असेल, तेव्हां लोकल डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारांस, टेलिग्राफ मास्तरांला तार हंशिलाचे स्टांप पैसा न घेतां, कायमच्या अगाऊ पुरवठ्याच्या किंमतीबाहेर देण्याचा अधिकार आहे, आणि ह्या हंगामी अगाऊ पुरवठ्यांची व्यवस्था ट्रेझरी परत उघडल्यावर, ते स्टांप परत देऊन किंवा ते विकले असल्यास त्यांची किंमत देऊन, लावली पाहिजे.

२१. सरकारी कामाचे टपाल हंशिलाचे स्टांप लेखी अर्जीवरून सरकारी कामगारांस व असे स्टांप खरीद करण्याचा व त्यांचा उपयोग करण्याचा विशेष रीतीनें अधिकार दिलेल्या मनुष्यांस रोख पैसा घेऊन लोकल डिपोंतून विकले पाहिजेत. अशा स्टांपांच्या विक्रीवर वर्तवळा मिळणार नाहीं.

२२. लोकांला साधारण टपाल हंशिलाचे स्टांप रोख पैसा घेऊन लोकल डिपोंतून विकले पाहिजेत, मात्र कोणत्याही मनुष्यास एका वेळीं विकलेल्या स्टांपांची किंमत ९ रुपयांहन कमी नसून तीत रुपयाचा कोणताही अंश असूं नये, आणि वठविलेले लखोटे व पोस्टकार्डें यांचीं आंखीं पाकिटेंच विकलीं पाहिजेत. अशा विक्र्यांवर वर्तवळा मिळणार नाहीं. सोजिरांच्या लखोट्यांचीं आंखीं पाकिटें फक्त कांहीं निवडक लोकल डिपोंतून कमांडिंग आफिसरांस विकलीं जातात, व त्यांवर वर्तवळा देण्यांत येत नाहीं.

२३. रवाना करण्याकरितां जेथें पत्रें घेण्यांत येतात असें दरेक पोस्ट आफीस, रिसीव्हिंग आफीस, तहसील, ठाणें, व पोलीस-ठाणें स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें, आणि सन १८७९ च्या स्टांप आक्टाअन्वयें केलेल्या कानूंवरून ज्या कोणास सामान्य स्टांप विकण्याकरितां लैसन दिलें असेल अशा दरेक मनुष्यानें, अजमासें एका आठवड्याच्या खपाला पुरत इतके साधारण टपाल हंशिलाचे स्टांप लोकांला विकण्यासाठीं ठेवणें जरूर आहे. अशा मनुष्यांस, सोजिरांचे लखोटे खेरीज करून, साधारण टपाल हंशिलाचे स्टांप रोख पैसा घेऊन लोकल डिपोंतून, त्यांच्या परिमाणाच्या संबंधानें गेल्या कानूंत ज्या शर्ती सांगितल्या आहेत त्याच शर्तींवर विकण्यांत येतात; आणि अशा विक्रीवर रुपयास पाव आण्याप्रमाणें वर्तवळा देण्यांत येतो.

मोठ्या आकृतीचे नोंदणीचे लखोटे यांच्या सर्व विक्र्यांवर रुपयास ½ आणा या मानानें विशेष जादा कमिशन मंजूर केलेलें असून तें तारीख ११ नव्हेंबर सन १८९२ पासून अमलांत आलें आहे.

२४. तसेंच, रवाना करण्याकरितां जेथें पत्रें घेण्यांत येतात अशीं पोस्ट आफिसें, रिसीव्हिंग आफिसें, तहसिली, ठाणीं, व पोलीस-ठाणीं स्वाधीन असणाऱ्या अमलदारांनीं, लोकांला विकण्याकरितां एक आण्याच्या रेव्हिन्यू स्टांपांचा पुरवठाही ठेवणें जरूर आहे. अशा अमलदारांस एक आण्याचे रेव्हिन्यू स्टांप लोकल डिपोंतून, २२ व्या कानूंत परिमाणाबाबद ज्या शर्ती सांगितल्या आहेत त्याच शर्तींवर, विकण्यांत येतात. अशा स्टांपांच्या विक्रीवर रुपयास अर्ध्या आण्याप्रमाणें वर्तवळा देण्यांत येतो.

२५. कोणत्याही डिस्ट्रिक्ट आफिसरास, साधारण टपाल हंशिलाचे स्टांप इमानें इतबारें फुटकळ विकणाऱ्या कोणत्याही वेंडरास, तो सरकारी ट्रेझरींत नौकरीस नसला तर, रुपयास पाव आण्याप्रमाणें वर्तवळा देण्याविषयीं अधिकार देतां येईल. असा अधिकार लेखी दिला पाहिजे, व तो एक वर्षपर्यंत अमलांत राहील. अशा अधिकारांत, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबतीसबंधीं शर्ती करण्याचा अधिकार आहे, ह्मणजे—फुटकळ विक्रीकरितां सर्व किंवा कोणत्याही निर्दिष्ट केलेल्या जातीचे टपाल हंशिलाचे स्टांप यांचा पुरेसा पुरवठा राखणें; अमुक एका किंवा अधिक दुकानीं किंवा जागीं स्टांप विकणें व दुसऱ्या दुकानीं किंवा जागीं ते विकण्याची मनाई करणें; आणि विक्रीचे दिवस व तास, या बाबतींसंबंधीं शर्ती करण्याचा अधिकार आहे. सदरहू डिस्ट्रिक्ट आफिसरानें एक रजिस्टर ठेवून त्यांत, ज्या ज्या मनुष्यास त्यानें असा अधिकार दिला असेल तशा दरेक मनुष्याचें नांव, राहण्याचें ठिकाण, व धंदा, हीं नमूद केलीं पाहिजेत.

२६. पोस्ट आफिसांचे सुपरिंटेंडेंट व इन्स्पेक्टर यांस आपापल्या अधिकारांतील प्रदेशाच्या आंत, आणि पोस्ट मास्तर जनरल किंवा डिपुटी पोस्ट मास्तर जनरल यानें पोस्ट आफीसच्या ज्या कोणत्याही दुसऱ्या अमलदारांस त्यासाठीं अधिकार दिला असेल त्यांस, कानू २३ व २५ यांअन्वयें लोकांस विकण्याकरितां टपाल हंशिलाचे स्टांप ज्या मनुष्यांनीं ठेवणें जरूर आहे किंवा ज्यांस ते ठेवण्याचा अधिकार दिला आहे त्यांपैकीं कोणत्याही मनुष्यानें ठेवलेला टपाल हंशिलाच्या स्टांपांचा सांठा तपासण्याचा अख्त्यार आहे.

## *ब्रांच डिपो.

२७. दरेक ताब्यांतील, ब्रांच किंवा तहसील ट्रेझरी ही, सर्व प्रकारचे स्टांप विकण्याकरितां ब्रांच डिपो आहे असें समजावें.

---

**टीप.**—स्टांप वठविलेल्या सर्व लखोट्यांच्या किंवा पोस्टाच्या व्यापरांच्या बाबतींत वर्तवळा किंवा कमिशन स्टांपाच्या वरल्या बाजूवरील किंमतीवरून आकारलें पाहिजे.

* ब्रांच = शाखा.

परंतु जेव्हां अशा कोणत्याही ब्रांच डिपोंतून स्टांपांची विक्री फारच थोडी होईल, आणि ही ब्रांच डिपो ज्या ठाण्यांत असेल त्याच ठाण्यांतील एखाद्या डिपोंतून स्टांपांचा पुरवठा करण्याची अशा ब्रांच डिपो-प्रमाणेंच सवड असेल, तेव्हां ती ब्रांच डिपो बंद करण्याविषयीं हुकुम फर्माविण्याचा स्थानिक सरकारास अधिकार आहे.

२८. सब-ट्रेझरर, किंवा स्थानिक सरकार फर्मावील तसा दुसरा अमलदार हा, हुद्द्याच्या नात्यानें ब्रांच डिपोचा स्टांप-वेंडर आहे असें समजावें.

२९.. ब्रांच डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें आपले स्टांपांचे पुरवठे, ज्या लोकल डिपोंच्या ताब्यांत अशी ब्रांच डिपो असेल त्या लोकल डिपोंतून, अशा लोकल डिपोच्या हुद्द्याच्या नात्याचा वेंडर ज्या रीतीनें आपले पुरवठे मागवीत असेल त्याच रीतीनें मागविले पाहिजेत : मात्र अशा अमलदाराचें इन्डेंट टपाल-मार्फत किंवा जासुदामार्फत लोकल डिपोला पाठविलें पाहिजे, व मागविलेले स्टांप लोकल डिपोंतून त्याच-प्रमाणें पाठविले पाहिजेत; आणि हातीं असलेल्या शिल्केची तपासणी, व दाखविलेल्या स्टांपांची इन्डेंटांत नमूद केलेल्या स्टांपांशीं रुजुवात ह्या, ब्रांच डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें केल्या पाहिजेत. ज्या प्रसंगीं कांहीं खर्च खास वांचण्याचा किंवा स्टांप रस्त्यानें विशेष सुरक्षितपणें जाण्याचा संभव असेल, तेव्हां बोर्ड आफ् रेव्हिन्यू किंवा इतर वरिष्ठ रेव्हिन्यू अधिकारी यास, सेंट्रल डिपोंतून ब्रांच डिपोंस स्टांप परभारें पाठविण्याविषयीं मंजूरी देण्याचा अधिकार स्थानिक सरकारास देतां येईल, मात्र असे स्टांपांचे पुरवठे, अशा ब्रांच डिपो ज्या लोकल डिपोंच्या ताब्यांत असतील त्या लोकल डिपोंला पाठविल्याप्रमाणें स्टांपांच्या सुपरिंटेंडंटानें मानले जाऊन ते लोकल डिपोंच्या हिशेबीं सामील झाले पाहिजेत. सदरहू हुद्द्याच्या नात्याच्या वेंडरानें आपले स्टांपांचे पुरवठे ब्रांच डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदाराकडून, लोकल डिपोंचा हुद्द्याच्या नात्याचा वेंडर आपले पुरवठे ती डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदाराकडून ज्या रीतीनें मागवीत असेल त्याच रीतीनें मागविले पाहिजेत.

३०. ब्रांच डिपोंत ठेवावयाचा स्टांपांचा पुरवठा अजमासें तीन महिन्यांच्या खपाला पुरे इतका असला पाहिजे; परंतु तीन महिन्यांच्या बदला स्थानिक सरकारांस जी दुसरी काणतीही मुदत योग्य वाटेल त्या मुदतींत होणाऱ्या खपास पुरे इतका सदरहू पुरवठा असला पाहिजे असें फर्माविण्याचा त्या सरकारास अधिकार आहे. जरूर लागेल त्याप्रमाणें वेळोवेळीं इन्डेंट करून व लोकल डिपोंतून स्टांप आणवून वर सांगितला आहे तेवढा सांठा राखला पाहिजे.

३१. किती मुदतीपर्यंत पुरेसा पुरवठा सदरहू हुद्द्याच्या नात्याच्या वेंडरानें एका कुलुपांत ठेवावा तें स्थानिक सरकारें ठरवितील, आणि ब्रांच डिपोंतील बाकीचे स्टांप, ब्रांच डिपो स्वाधीन असणारा अमलदार व हुद्द्याच्या नात्याचा वेंडर या दोघांच्या दोन कुलुपांमध्यें ठेऊन, ते लागतील त्याप्रमाणें एका कुलुपांत दिले पाहिजेत.

३२. ज्या नियमास अनुसरून लोकल डिपोंतून स्टांपांची विक्री करावयाची, त्याच नियमांस अनुसरून ब्रांच डिपोंतून त्यांची विक्री करावी.

## सुपरिंटेंडंट आफ् स्टांप आणि अकौंटंट जनरल यांस व यांनीं पाठवावयाचे तक्ते.

३३. दरसाल सप्टेंबर महिन्याच्या व मार्च महिन्याच्या शेवटल्या कचेरीच्या दिवशीं, प्रत्येक लोकल डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें त्या डिपोंतील, दोन कुलुपांमधले व एका कुलुपामधले, दोन्ही ठिकाणचे स्टांप मोजावे, किंवा आपल्या समक्ष मोजवावे, आणि आपल्या ताब्यांतील ब्रांच डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारांस त्याचप्रमाणें ब्रांच डिपोंतील स्टांप मोजण्यास सांगावें. सप्टेंबर व मार्च यांबदलचीं माही पत्रकें, कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटास पाठवावयाचीं त्यांस, किंवा *रकान्यांत लिहिलेल्या प्रांतांत स्टांपांच्या स्थानिक सुपरिंटेंडंटास किंवा कमिशनरास किंवा स्थानिक सरकारानें सांगितलेल्या इतर अमलदारास पाठवावयाचीं त्यांस, खालीं लिहिलेल्या नमुन्याप्रमाणें त्यानें दाखला जोडावा:—

* वायव्य प्रांत व अयोध्या, पंजाब, मध्य प्रांत, आणि वऱ्हाड. [मद्रास येथील सेंट्रल डिपोंतून वऱ्हाडांत पुरविलेल्या चिकटणाऱ्या रेव्हिन्यू स्टांपांच्या बाबतींत, सदरहू माही पत्रकें मद्रास येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटाकडे पाठविण्याचें चालू ठेवावें.]

मी दाखला लिहून देतों ऐसाजे ह्या लोकल डिपोंतल्या दास्तानांतील सर्व प्रकारचे स्टांप सन १८ च्या $\frac{\text{सप्टेंबर}}{\text{मार्च}}$ महिन्याच्या तारिखेस मीं जातीनें तपासले व मोजले, किंवा माझ्यासमक्ष मोजविले, आणि प्रत्येक प्रकारच्या स्टांपांची किंमत रकान्यांत* लिहिल्याप्रमाणें आहे असें मला दिसून आलें. तसेंच, माझ्या ताब्यांतील ब्रांच डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारांकडून माझ्याकडे असे दाखले आले

| | रु. |
|---|---|
| * सामान्य स्टांप... ... | |
| कोर्टफी स्टांप ... ... | |
| तार हंशिलाचे स्टांप ... | |
| टपाल हंशिलाचे स्टांप ... | |

आहेत कीं त्यांणीं त्याचप्रमाणें $\frac{\text{सप्टेंबर}}{\text{मार्च}}$ महिन्याच्या शेवटल्या दिवशीं ब्रांच डिपोंतील स्टांप मोजले असून त्यांचे हिशोब हेड ट्रेझरीच्या हिशोबांत सामील केले आहेत, व ह्या दाखल्यांवरून प्रत्येक प्रकारच्या स्टांपांची किंमत रकान्यांत† लिहिल्याप्रमाणें आहे असें समजतें.

| | रु. |
|---|---|
| †सामान्य स्टांप ... ... | |
| कोर्टफी स्टांप ... ... | |
| तार हंशिलाचे स्टांप ... | |
| टपाल हंशिलाचे स्टांप ... | |

सबब ह्या डिपोंतील व ब्रांच डिपोंतील स्टांपांच्या एकंदर किमती, सदरील दाखल्यांत सांगितलेल्या तपासणीवरून समजून आल्या त्या—

| | रु. |
|---|---|
| सामान्य स्टांप ... ... ... ... | |
| कोर्टफी स्टांप (नकलांबद्दलच्या स्टांपांसुद्धा) .. | |
| तार हंशिलाचे स्टांप ... ... ... | |
| टपाल हंशिलाचे स्टांप | |

याप्रमाणें आहेत.

ह्या रकमा, $\frac{\text{सप्टेंबर}}{\text{मार्च}}$ महिन्याचें माही पत्रक कीं ज्यास हा दाखला जोडला आहे, त्यांत दाखविलेल्या शिलकांशीं जुळतात. जर कांहीं तफावत असेल, तर पुढील मजकूर जास्त दाखल करावा: मात्र पुढें लिहिल्याप्रमाणें तफावत आहे:— व याचा खुलासा येणेंप्रमाणें आहे:—

३४. ताब्यांतील ब्रांच डिपोंनीं केलेल्या व्यवहारांसुद्धा, प्रत्येक लोकल डिपोंत आलेले व त्यांतून दिलेले स्टांप दर्शविणारीं माही पत्रकें अशी लोकल डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदारानें तयार केलीं पाहिजेत आणि तीं, पुढल्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटास, किंवा सदरहू स्टांपांच्या स्थानिक सुपरिंटेंडंटास किंवा कमिशनरास, किंवा ३३ व्या कानूंत निर्दिष्ट केलेल्या इतर अमलदारास पाठविलीं पाहिजेत; हीं पत्रकें सामान्य स्टांप, कोर्टफी स्टांप, तार हंशिलाचे स्टांप व टपाल हंशिलाचे स्टांप यांबदल निरनिराळीं तयार केलीं पाहिजेत.

ह्या पत्रकांमध्यें प्रत्येक जातीच्या स्टांपांबदल, प्रत्येक महिन्याच्या प्रारंभीं हातीं असलेल्या शिल्केचीं, महिन्यामध्यें स्टांपांच्या सुपरिंटेंडंटाकडून किंवा दुसऱ्या अमलदाराकडून आलेल्या स्टांपांची, महिन्यांत विकलेल्या स्टांपांची, आणि महिन्याच्या अखेरीस हातीं राहिलेल्या शिल्लकेची किंमत दाखविली पाहिजे. हीं पत्रकें, कलकत्ता, मद्रास, किंवा मुंबई येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटाकडे, किंवा सदरहू स्टांपांचा स्थानिक सुपरिंटेंडंट अगर कमिशनर याकडे, परभारें, किंवा स्थानिक सरकारानें सांगितलेल्या कोणत्याहि अमलदाराच्या मार्फत पाठवावीं.

३५. हीं पत्रकें, कलकत्ता, मद्रास किंवा मुंबई येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटानें, किंवा सदरहू स्टांपांचा स्थानिक सुपरिंटेंडंट किंवा कमिशनर यानें, किंवा ३३ व्या कानूंत निर्दिष्ट केलेल्या इतर अमलदारानें पूर्वींचीं पत्रकें व सेंट्रल डिपोंचे हिशोब यांच्याशीं रुजू घेतलीं पाहिजेत, व त्यांचा त्यांनीं, इन्डेंटें ता-

डून पाहण्यासाठीं आणि लोकल डिपोंमधील शिल्का कसकशा राहतात तें पाहण्यासाठीं उपयोग केला पाहिजे. कोणत्याहि लोकल डिपोंतील कोणत्याहि प्रकारच्या स्टांपांची शिलक फारच कमी होत जात आहे असें व्यवहारांच्या माही पत्रकांवरून दिसून आल्यास, ती गोष्ट ती डिपो स्वाधीन असणाऱ्या अमलदाराच्या नजरेस आणावी. स्टांपांचा प्रत्येक स्थानिक सुपरिंटेंडंट किंवा कमिशनर, किंवा ३३ व्या कानूंत निर्दिष्ट केलेला दुसरा अमलदार यास असे तक्ते ताडून पाहतां यावे ह्मणून त्यास कलकत्ता किंवा मुंबई येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटानें, आपापल्या ताब्यांतील लोकल डिपोंस किती स्टांप दिले व त्यांकडून किती परत आले तें दाखविणारीं माही पत्रकें पाठवावीं.

३६. ट्रेझरी आफिसर व लोकल डिपो स्वाधीन असणारे दुसरे अमलदार ह्यांनीं, ह्रस व मैनस यादींच्या नमुन्याप्रमाणें किंवा इतर रीतीनें, कंट्रोलर जनरल फर्मावील तसे, स्टांप किती आले व किती विकले हें दाखविणारे तक्ते स्थानिक अकौंटंट जनरल किंवा कंट्रोलर याजकडे पाठविले पाहिजेत.

३७. स्टांपांचा प्रत्येक सुपरिंटेंडंट किंवा कमिशनर किंवा ३३ व्या कानूंत निर्दिष्ट केलेला इतर अमलदार यानें कंट्रोलर जनरल ठरवील तसे सेंट्रल व लोकल डिपोंच्या व्यवहारांसंबंधीं हिशोब सदरहू अकौंटंट जनरल किंवा कंट्रोलर याजकडे पाठविले पाहिजेत.

३८. तसेंच त्यांनीं, सदरहू अकौंटंट जनरल किंवा कंट्रोलर याला, ३६ व्या कानूअन्वयें ट्रेझऱ्यांकडून व इतर लोकल डिपोंकडून आलेल्या तक्त्यांमध्यें दाखवलेल्या स्टांपांशीं रुजू घेण्याकरितां, ३३व्या कानूंत सांगितलेले दाखले आले असल्याबदल व दरेक लोकल डिपोंत किती स्टांप शिलक असल्याचा दाखला दिला आहे त्याबद्दल दर साहा महिन्यांस कळविलें पाहिजे.

३९. कंट्रोलर जनरलानें, वरील कानूंमध्यें सांगितलेल्या हिशोबांची व्यवस्था लावण्याकरितां, आणि आलेल्या, दिलेल्या व विकलेल्या स्टांपांची रुजुवात घेण्याकरितां आपणास जरूर वाटतील तशा कानू केल्या पाहिजेत.

४०. बंगाल, मद्रास व मुंबई येथील स्थानिक सरकारांनीं आपापल्या सेंट्रल डिपोंतील स्टांपांचा सांठा खरोखर किती आहे हें पाहण्यासाठीं कांहीं नियमित मुदतीनें तो मोजण्याची तजवीज केली पाहिजे. सदरहूप्रमाणें सांठा खरोखर किती आहे हें पाहण्याचें काम, कंट्रोलर जनरल सांगेल त्या रीतीनें व नमुन्याप्रमाणें केलें पाहिजे, व त्याचा निकाल त्यास कळविला पाहिजे.

४१. कलकत्ता, मद्रास व मुंबई येथील स्टांपांच्या सुपरिंटेंडंटांनीं प्रत्येक महिन्याला, पोस्ट आफीसच्या डरेक्टर जनरलास महिन्यांत टपाल हंशिलाचे स्टांप सेंट्रल डिपोंत किती शिलक आहेत व किती आले तें आणि प्रत्येक लोकल डिपोला किती दिले तें दाखविणारें एक पत्रक पाठविलें पाहिजे. तसेंच स्टांपांचा प्रत्येक सुपरिंटेंडंट किंवा कमिशनर यानें किंवा ३३ व्या कानूंत निर्दिष्ट केलेल्या इतर अमलदारानें पोस्ट आफीसचा कंट्रोलर यास, आपल्या ताब्यांतील लोकल व ब्रांच डिपोंत गेल्या महिन्यांत निरनिराळ्या जातीच्या टपाल हंशिलाच्या स्टांपांची विक्री किती झाली त्याबदलचें एक पत्रक प्रत्येक महिन्यास पाठविलें पाहिजे. प्रत्येक अकौंटंट जनरल किंवा कंट्रोलर यानें, एक्झामिनर आफ् टेलिग्राफ अकौंट्स याजबरोबर असलेला आपला माही चालू हिशोब पाठवितांना त्यासोबत, त्या महिन्यांत प्रत्येक ट्रेझरींत तार हंशिलाच्या स्टांपांच्या विक्रीपासून एकंदर किती उत्पन्न झालें तें दाखविणारें एक पत्रक पाठवावें."

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

**हाजी नेण्याआणण्याच्या कामाचें नियमन करण्यासंबंधाचा हिंदुस्थान सरकारच्या ( होम डिपार्टमेंटाच्या ) आरोग्यरक्षणखात्याचा ठराव नंबर $\frac{\text{६—आरोग्यरक्षण}}{\text{१७२—१७९}}$, तारीख २८ माहे जून सन १८९५.**

तांबडा समुद्र व इराणचें अखात यांच्या मार्गानें पश्चिमेकडील देशांमध्यें पटकीचा प्रसार न होऊं देण्याचीं उत्तम साधनें कोणतीं ह्याविषयीं विशेष विचार करण्यासाठीं, सन १८९४ सालाच्या प्रारंभीं, पारिस येथें निरनिराळ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक आरोग्यरक्षणसंबंधी सभा भरविली होती. त्या सभेपुढें येणाऱ्या विषयांचा विचार करण्यासाठीं ब्रिटिश सरकारास त्या सभेला येण्याविषयीं आलेलें आमंत्रण त्या सरकारानें मान्य केलें आणि त्या सभेनें जो एक करारनामा एप्रिल १८९४ ह्या महिन्यांत तयार केला, तो मलिका माआझमांच्या सरकारानें, खालीं सांगितलेल्या तीन गोष्टी शिवाय करून बाकीच्या बाबतींच्या संबंधानें कबूल केला. ह्या करारनाम्याचें बंधन पांच वर्षेंपर्यंत राहील, आणि ती मुदत संपण्याच्या आधीं साहा महिने त्यांतून अंग काढून घेण्याविषयींची नोटीस दिली नाहीं तर त्याचें बंधन पुनः चालू होईल.

त्या करारनाम्यांतले ठराव, ज्या अर्थी, ब्रिटिश हिंदुस्थान व अरबस्थान ह्यांच्या दरम्यान जलमार्गानें हाजी नेण्याआणण्याच्या कामीं प्रत्यक्ष लागू व्हावेत अशा इरादानें त्यांस दाखल केले होते, त्या अर्थी तें काम प्रस्तुत ज्या कायद्याप्रमाणें चालतें त्या कायद्यांत काय काय सुधारणा केल्या पाहिजेत ह्याचा विचार करणें जरूर पडलें. ह्यांपैकीं कांहीं ठरावांअन्वयें, हल्लीं चालू असलेल्या व्यवस्थेमध्यें बराच फेरबदल करावा लागणार आहे ह्मणून, त्या ठरावांप्रमाणें व्यवस्था करण्याचा उत्तम मार्ग कोणता, ह्याविषयीं हिंदुस्थान सरकारचा, मलिका माआझमांचे सेक्रेटरी आफ् स्टेट ह्यांबरोबर आणि ज्या स्थानिक सरकारांच्या हद्दींमध्यें समुद्रकिनारा आहे त्या स्थानिक सरकारांबरोबर, पत्रव्यवहार चालला होता. शेवटीं असें ठरलें कीं, ह्या प्रकरणीं सर्व बाबतींचा विचार करितां, हाजींस नेण्याआणण्याच्या कामीं लाविलेल्या तारवांस सन १८८७ चा देशी उतारू नेणाआणणाऱ्या तारवांबाबद आक्ट लागू आहे तो त्यांस लागू असण्याचा बंद करून त्या तारवांसाठीं एक निराळाच कायदा पसार करणें हें सर्वांत सोइस्कर होईल. ह्या उद्देशानें तयार केलेला एक कायद्याचा मसुदा, गव्हर्नर जनरलांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलांत लवकरच रुजू करण्यांत येणार आहे, आणि हल्लीं अमलांत असलेल्या नियमांमध्यें सर्व जरूरीचे फेरफार करण्याकरितां नवीन कानूही तयार होत असून त्या कानू ह्या नव्या कायद्याअन्वयें त्याबरोबरच अमलांत आणण्याचा इरादा आहे. दरम्यान, हे लवकरच करण्यांत येणारे फेरफार कित्येक बाबतींत बऱ्याच महत्वाचे असल्याकारणानें, आणि सन १८९६ सालच्या हजचें नियमन करण्यासाठीं ते योग्य वेळीं अमलांत येतील अशी आशा आहे ह्मणून, त्या फेरफारांच्या संबंधाची पूर्ण माहिती होईल तितकी लवकर लोकांपुढें मांडण्याची ही संधी साधणें इष्ट आहे असें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस वाटत आहे.

२. ज्या बाबतींमध्यें कायदा करून फेरफार करावयाचे आहेत, त्या बाबती खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत :—

**(१) "हाजी नेणारें तारूं" ह्याची व्याख्या.**

सन १८८७ चा देशी उतारू नेणाआणणाऱ्या तारवांबाबद आक्ट" ह्याच्या ९व्या कलमाच्या (२) रकमेअन्वयें, तो आक्ट लागू असणाऱ्या तारवावरील उतारूची व्याख्या ' जें मनुष्य एशियाचें किंवा आफ्रिकेचें देशी असून जें बारा वर्षांच्या किंवा त्याहून अधिक वयाचें असेल, आणि ज्याचें नांव तारवाच्या आर्टिकलांमध्यें [ नौकरीच्या करारांमध्यें ] तारवाच्या नौकर लोकांपैकीं असामी ह्मणून नमूद नसेल ' अशी केली आहे ; परंतु त्या संज्ञेंत, एशियाचें किंवा आफ्रिकेचें देशी नसणाऱ्या मनुष्याच्या सेवेंत असणाऱ्या उतारूचा अथवा एक वर्षाच्या वयाच्या आंतील मुलाचा समावेश होत नाहीं, आणि त्या आक्टाच्या कोणत्याही कारणाकरितां उतारूंची गणती करितांना, एका वर्षाच्या वयाचीं किंवा एका वर्षाहून अधिक वयाचीं व बारा वर्षांच्या वयाच्या आंत असणारीं दोन माणसें एका उतारूदाखल गणावीं लागतात. जी कोणतीही आगबोट एशिया खंडाचीं अगर आफ्रिका खंडाचीं ६० हून जास्त देशी मनुष्यें ( किंवा स्थानिक सरकार, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांच्या आधीं घेतलेल्या मंजुरीनें, ६० पासून ३० पर्यंत खालीं उतरती अशी जी कोणतीही कमींत कमी संख्या ठरवील तीहून जास्त देशी मनुष्यें ) उतारूंदाखल नेत नसेल त्या आगबोटीस सदरहू आक्ट लागू होत नाहीं. सदरहू करारनाम्यांतील शर्तींस अनुसरून, योजिलेला मसुदा, हाजी नेणाऱ्या सर्व तारवांस लागू केला जाईल आणि त्या मसुद्याअन्वयें, [ अशा तारवांतला ] दरेक इसम, मग तो कोणत्याही वयाचा

असो, हाजी ह्मणून गणला जाईल; मात्र ज्या कोणत्याही तारवावर त्याच्या साधारण उतारूंशिवाय ( ह्या साधारण उतारूंत वरच्या वर्गाच्या हाजींचा समावेश करतां येईल ), त्याच्या एकंदर बारदानापैकीं दर शंभर टनांला एक हाजी ह्याहून कमी प्रमाणानें अगदीं खालच्या वर्गाचे हाजी असतील तें तारूं हाजी नेणारें तारूं गणलें जाणार नाहीं.

ज्या तारवांस सदरहू नियम प्रस्तुत लागू नाहींत त्या तारवांस ते लागू करण्यांत सदरील सभेचा उद्देश हा होता कीं, नालायक व ज्यांवरची आरोग्यरक्षणसंबंधी व्यवस्था हवीतशी किंवा पुरती नसेल अशा तारवांतून हाजी नेण्याचा प्रतिबंध व्हावा.

## (२) हकारण्याबद्दल सूचना.

सन १८८७ चा देशी उतारू नेणाआणणाऱ्या तारवांबाबद आक्ट ह्याच्या ७ (२) कलमाअन्वयें, तारवाच्या मास्तरानें, मालकानें, किंवा एजंटानें, आपलें तारूं हकारण्याच्या इराद्याची सूचना, हकारण्याच्या वेळापूर्वी निदान २४ तास दिली पाहिजे. हाजी नेणाऱ्या तारवांच्या बाबतींत, ही सूचना देण्याची मुदत वाढवून तीन दिवस केली पाहिजे असा सदरहू सभेनें ठराव केल्यावरून, त्याप्रमाणें फेरफार केलेला ठराव योजिलेल्या मसुद्यांत दाखल करण्यांत येईल.

## (३) वरचें डेक.

सदरहू करारनाम्यांत असा ठराव केला आहे कीं, सफर चालू असतांना, तारवाच्या डेकवर कोणतेंही सामान ठेवून तें न अडवितां, तें, रात्रंदिवस, तारवांत घेतलेल्या लोकांसाठीं राखून ठेवून त्यांना त्याचा फुकट उपयोग करूं दिला पाहिजे.

ह्या अर्थाचा एक ठराव योजिलेल्या मसुद्यांत दाखल केला जाईल.

## (४) इस्पितळाची जागा.

तारवावर जितके हाजी असतील त्यांपैकीं दर शेंकडा पांच हाजींकरितां दरमाणशीं ३ चौरस मीटर ( ३२ चौरस फूट ) ह्या मानानें इस्पितळाची जागा त्या तारवावर असली पाहिजे असें सदरहू सभेनें ठरविलें आहे. ही जागा हल्लीं देण्यांत येते त्या जागेपेक्षां बरीच जास्ती आहे. [तथापि] योजिलेल्या मसुद्यांत, ह्यासंबंधाचा जरूर आहे तो ठराव दाखल करण्यांत येईल.

## (५) तारवावर चढण्याच्या आधीं वैद्यकीय तपासणी.

सदरहू सभेनें ही बाबत बऱ्याच महत्वाची गणली होती. हिंदुस्थान सरकारानें, गेल्या आक्टोबर महिन्यांत, ज्यांच्या हद्दींत समुद्रकिनारा आहे त्या स्थानिक सरकारांस ह्या प्रकरणासंबंधानें लिहून पाठवितांना आपला अभिप्राय असा दिला होता कीं, हाजी लोकांस तपासल्याशिवाय तारवावर जाऊं देण्याची वहिवाट फार दोषास्पद आहे, कारण, त्या वहिवाटीच्या योगानें, सांक्रामिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेल्या मनुष्यांच्या द्वारें ते रोग हाजी नेणाऱ्या तारवांवर जाण्याचा संभव आहे. ही स्थिति सुधारण्याच्या कामीं कांहीं व्यावहारिक अडचणींचें निवारण करावें लागेल असें आहे तरी, सदरहू स्थानिक सरकारांचें मत हिंदुस्थान सरकाराप्रमाणेंच पडलें. त्या अर्थीं, हाजींस तारवावर घेण्याच्या अगदीं थोडा वेळ आधीं त्यांची जमिनीवरच वैद्यकीय तपासणी झाली पाहिजे, आणि, पटकीचा वाखा किंवा पटकीच्या स्वरूपाची हगवण लागलेल्या मनुष्यांच्या संपर्कानें दूषित झालेल्या जिनसा, त्यांतल्या रोगबीजाचा नाश करण्यांत येई तोंपर्यंत तारवावर नेऊं देऊं नयेत, आणि ते रोग झालेल्या मनुष्यांसही तारवावर घेऊं नये, असे जे ठराव सदरहू सभेनें केले होते, त्यांप्रमाणें अमल होण्याकरितां योजिलेल्या मसुद्यांत ठराव दाखल करण्यांत येईल.

## (६) कामरान व जेद्दा येथील आरोग्यरक्षणसंबंधी कर.

सदरहू करारनाम्यांत असें ठरविलें आहे कीं, हाजी नेणारें तारूं ज्या ज्या बंदरीं लागेल, त्या त्या बंदरचे आरोग्यरक्षणसंबंधाचे सर्व कर त्या तारवाच्या मास्तरानें दिले पाहिजेत; आणि अशी सूचना करण्यांत आली आहे कीं, ह्या करांची रकम, तिकिटांच्या किंमतींत दाखल करावी. हे कर मास्तरानें देण्याबद्दल, योजिलेल्या मसुद्यांत एक ठराव दाखल केला जाईल.

हिंदुस्थानांतले हाजी लोक आरोग्यरक्षणसंबंधाच्या फी मुळींच देत नाहींत असें पुष्कळ वेळां घडून येतें अशी तुर्की अधिकाऱ्यांकडून तक्रार करण्यांत आल्यावरून त्या सभेनें सदरील ठराव केला. आरोग्यरक्षणसंबंधी स्थानिक सुधारणांचा खर्च, अंशतः, हाजींपासून घेतलेल्या फींतून देण्यांत येतो अगर द्यावा लागतो ह्मणून सभेच्या सभासदांस असें वाटलें कीं, योग्य फी वसूल करण्याच्या कामीं स्थानिक अधिकाऱ्यांस मदत केली नाहीं तर, तशा सुधारणा करण्याविषयीं आग्रह करतां यावयाचा नाहीं.

येथें हें सांगितलें पाहिजे कीं, ज्या अटीवर कामरान गांव क्वारंटाइन ठाणें चालू ठेवण्याबद्दल त्या सभेस आलेल्या ब्रिटिश प्रतिनिधींनीं संमति दिली होती, त्या अटी तुर्की सरकारानें मान्य न केल्यामुळें, सदरील ठराव तावडतोब अमलांत आणणें कठिण झालें आहे. त्या अटी ह्या होत्या कीं, हाजी नेणारीं तारवें कामरान येथें पोंचल्यावर त्यांची वैद्यकीय तपासणी होऊन तीं " इंडेम्नीज् " " सस्पेक्टस् " व " इन्फेक्टिस् " *ह्या वर्गांपैकीं ज्या वर्गाचीं ठरविण्यांत येतील त्या वर्गास अनुसरून त्यांची निरनिराळ्या रीतीनें व्यवस्था केली पाहिजे. तीं पहिल्या वर्गाचीं ठरविलीं तर त्यांना कामरान येथें ४८ तास मात्र अटकावून ठेवावें; तीं " सस्पेक्टस् " ह्या वर्गाचीं ठरविलीं तर त्यांना ४८ तास अटकावून ठेवून शिवाय जेद्दा येथें त्यांची दुसऱ्यानदां वैद्यकीय तपासणी व्हावी, आणि तीं " इन्फेक्टिस् " वर्गाचीं ठरविलीं तर त्यांना, तीं कामरान येथें पोंचल्याच्या दिवसापासून पांच दिवसपर्यंत अगर त्यांवर पटकीचा वाखा शेवटीं ज्या दिवशीं झाला असेल त्या दिवसापासून पांच दिवस पर्यंत, कामरान येथें अटकावून ठेवून शिवाय जेद्दा येथें त्यांची दुसऱ्यानदां वैद्यकीय तपासणी व्हावी. आजपर्यंतची वहिवाट अशी आहे कीं, हिंदुस्थानांतल्या बंदरांहून येणाऱ्या तारवांवरच्या सर्व हाजी लोकांस कामरान येथें समुद्राकिनाऱ्यावर दाहा दिवस पर्यंत राहवून घेतात, आणि पटकी किंवा पटकीच्या स्वरूपाची हगवण तारवावर झालेली असली किंवा क्वारंटाइन चालू असतांना उद्भवली, तर त्या लोकांस तेथें दाहांहूनही जास्त दिवसपर्यंत राहवून घेतात. आरोग्यरक्षणसंबंधी करांमुळें, जेद्दाच्या सफरीच्या दरेक तिकिटाच्या किंमतीमागें किती जास्त रकम द्यावी लागेल तें हिंदुस्थान सरकारास निश्चितपणें सांगतां येत नाहीं; तथापि, मुंबई येथील तुर्की कान्सल जनरलानें जे आंकडे पुरविले आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, हल्लीं कामरान येथील दाहा दिवसांच्या खोटीबद्दल आरोग्यरक्षणसंबंधी करांबाबदच्या खर्चाची रकम दर हाजी मागें कमींत कमी सुमारें १२ रु० ८ आणे होईल व त्याशिवाय जेद्दा येथें सुमारें २ रुपये पडतील.

* "इंडेम्नीज्" ह्मणजे ज्या तारवांवर, तीं ज्या बंदराहून निघालीं असतांल त्या बंदरीं, अगर सफरींत पटकीचा वाखा झालेला नसेल, तीं तारवें.

"सस्पेक्टस्" ह्मणजे ज्या तारवांवर पटकीचा वाखा झाला असेल, परंतु ज्यांवर कामरान येथें पोंचण्याच्या आधीं सात दिवसांच्या आंत नवीन माणसांस तो वाखा झालेला नसेल तीं तारवें.

"इन्फेक्टिस् ह्मणजे ज्या तारवांवर तीं कामरान येथें पोंचण्याच्या आधीं सात दिवसांच्या आंत नवीन माणसांस पटकीचा वाखा झालेला असेल तीं तारवें.

हाजींचीं तारवें जितक्या मुदतीपर्यंत कामरान येथें अटकावून ठेवावीं ह्मणून ब्रिटिश प्रतिनिधींनीं वर सांगितल्याप्रमाणें सुचविलें होतें, ती मुदत वाढवून, ती, " इंडेम्नीज् " वर्गांतील तारवांच्या बाबतींत तीन दिवस केली, " सस्पेक्टस् " वर्गांतील तारवांच्या बाबतींत पांच दिवस केली, आणि " इन्फेक्टिस् " वर्गांतील तारवांच्या बाबतींत दाहा दिवस केली, तर, हिंदुस्थानाहून जाणाऱ्या दरेक तारवास, वर सांगितलें आहे त्याप्रमाणें, कामरान येथें दाहा दिवस अटकावून ठेवण्याचा जो नियम आहे तो रद्द करण्यास आपण तयार आहों, असें पारिस येथील सभेंतील तुर्की प्रतिनिधींनीं सांगितल्यावरून, हिंदुस्थान सरकारानें मलिका माआझमांच्या सरकारास तुर्की सरकाराला असें लिहिण्याविषयीं सुचविलें आहे कीं, पारिसच्या सभेंत तुर्की प्रतिनिधी जे नियम करण्यास कबूल झाले होते, ते करून यापुढें अमलांत आणण्यास हरकत नाहीं. ह्याप्रमाणें घडून आलें तर आगबोटीच्या तिकिटाच्या किंमतीबरोबर आरोग्यरक्षणसंबंधी करांच्या ज्या रकमा द्याव्या लागणार आहेत, त्या बऱ्याच कमी होतील.

तुर्की अधिकाऱ्यांचा रिपोर्टावरून असें दिसतें कीं, ज्या गरीब हाजी लोकांस आरोग्यरक्षणसंबंधी फी देण्याचें सामर्थ्य नसतें त्या लोकांकडून हल्लीं त्या घेण्यांत येत नाहींत. प्रत्येक हाजीनें आरोग्यरक्षणसंबंधी कर आगाऊ दिलेच पाहिजेत असा सक्त नियम केल्याच्या योगानें अशा गरीब हाजी लोकांस त्रास पोंचेल ही गोष्ट लक्षांत आणून हिंदुस्थान सरकारानें, तुर्की सरकाराच्या विचारासाठीं त्यांपुढें अशी एक सूचना आणण्याचें ठरविलें आहे कीं, ज्या खरोखर गरीब स्थितींत असलेल्या हाजी लोकांस, त्यांच्या गरीबीमुळें त्यांस आरोग्यरक्षणसंबंधाचे कर माफ करणें वाजवी होईल अशा अर्थाचा, त्यांच्या जवळपास राहणाऱ्या प्रतिष्ठित मुसलमान गृहस्थांच्या सांगण्यावरून जिल्ह्याच्या अमलदारानें अगर पोलिटिकल आफिसरानें सही केलेला व हिंदुस्थानांतील एकाद्या तुर्की कान्सलानें मखलसी केलेला पास दिलेला असेल, त्यांस आगबोटीच्या नोराशिवाय पडणारे आरोग्यरक्षणसंबंधाचे कर माफ करण्यांत यावे. आलीजाह गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस असें वाटतें कीं असें केल्यानें हिंदुस्थानांत राहणाऱ्या गरीब मुसलमान लोकांची खर्चापासून बरीच सोडवणूक होईल, आणि त्यांची अशी अशा आहे कीं, ही योजना अमलांत आणणें शक्य होईल.

## (७) तारवावर दुसरा एक वैद्यकीय अमलदार असणें.

सदरहू करारनाम्यांत असे ठराव आहेत कीं, शंभर किंवा शंभरांहून जास्त हाजीलोक नेणाऱ्या दरेक तारवावर एक योग्य रीतीनें लायक ठरलेला वैद्यकीय अमलदार असला पाहिजे, आणि तारवांतली हाजीलोकांची संख्या १००० हून

जास्त असेल तेव्हां त्यावर आणखी एक तसा अमलदार असला पाहिजे. पैकीं पहिला ठराव हल्लीं अमलांत असलेल्या कायद्यास अनुसरून आहे; आणि, दरेक हाजीस जास्त जागा देण्याचा ठराव झाल्यामुळें (खालील पारिग्राफ ३ (अ) पहा), १००० हून जास्त हाजीलोक नेणाऱ्या आगबोटी आतां फारशा सांपडणार नाहींत तरी, त्यासंबंधानें सदरहू सभेनें जो ठराव केला आहे त्याप्रमाणें वहिवाट होणें जरूर आहे. ह्यासंबंधाचा ठराव योजिलेल्या मसुद्यांत दाखल करण्यांत येईल; आणि सदरील वैद्यकीय अमलदारांची लायकी कोणत्या प्रकारची असली पाहिजे ती कानूंमध्यें सांगितली जाईल.

### (८) तांबड्या समुद्राहून हिंदुस्थानास परत येतांना, आदनचें बंदर करण्याची वहिवाट बंद करणें.

हिंदुस्थान सरकारानें, मुंबई सरकारचेंही तसेंच मत पडल्यावरून, असें ठरविलें आहे कीं, हिंदुस्थानास परत येतांना हाजींच्या तारवांस आदन येथें लागणें भाग पडतें त्याची पुष्कळ प्रसंगीं जरूरी नसून तें गैरसोयीचेंही असतें. कौन्सिलांत जो मसुदा रुजू करावयाचा आहे त्यांत ह्या संबंधाचा ठराव दाखल केला जाईल. हा ठराव सदरहू करारनाम्याचे ठराव अमलांत आणण्यास जरूर आहे असें नाहीं, परंतु तो त्या करारनाम्यास कोणत्याही प्रकारें विरुद्ध नाहीं. हिंदुस्थानांतून जाणाऱ्या दरेक हाजींच्या तारवानें आदन येथें लागलेंच पाहिजे, आणि त्यानें क्लीन बिल आफ् हेल्थ (आरोग्य चांगलें असल्याबद्दलचा दाखला) घेतल्यावांचून तें बंदर सोडतां कामा नये असा हल्लींच्या कायद्यांत जो ठराव आहे, तो, योजिलेल्या मसुद्यांत तसाच ठेवावयाचा आहे.

३. देशी उतारू नेणाआणणाऱ्या तारवांबाबद आक्ट ह्याअन्वयें केलेल्या ज्या कानू हल्लीं अमलांत आहेत, त्यांमध्यें, सदरहू करारनाम्यांतील ठरावांमुळें ज्या बाबतींच्या संबंधानें फेरफार करावे लागत आहेत, त्यांतल्या मुख्य बाबती येणेंप्रमाणें:—

### (अ) दरेक हाजीस द्यावयाची जागा वाढविणें.

सदरहू करारनाम्यांतली ही बाबद सर्वांत जास्त महत्वाची आहे; कारण तिच्या योगानें, आगबोटीनें प्रवास करण्यास लागणारा खर्च बराच वाढेल. कायदा हल्लीं आहे त्याप्रमाणें (सन १८८७ चा आक्ट १० वा ह्याच्या २१ व्या कलमाप्रमाणें) ह्मटलें ह्मणजे, मोठी ह्मणजे ९ अगर त्यांहून जास्त दिवसांची सफर करणाऱ्या आगबोटीवरील दरेक उतारूला दरम्यानचे डेकवर निदान ९ चौरस फूट व ५४ घनफूट जागा द्यावी लागते; व १२ वर्षांहून कमी वयाचीं परंतु एका वर्षाहून कमी वय नसणारीं अशीं दोन मुलें मिळून एक उतारू गणला जाऊन एका वर्षाच्या आंतील मूल मुळींच गणलें जात नाहीं. त्या आक्टाच्या ९६ व्या कलमाअन्वयें, इतर कोणत्याही वर्गाच्या तारवांच्या बाबतींत उतारूंस किती चौरस अगर घनफूट जागा मिळाली पाहिजे त्यासंबंधानें इतर ठराव करण्याचा गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस अखत्यार आहे.

सदरहू करारनाम्यामध्यें असा ठराव आहे कीं, दरेक हाजीस (मग तो कोणत्याही वयाचा असो) २ चौरस मीटर (२१½ चौरस फूट) जागा मिळाली पाहिजे. ब्रिटिश सरकारानें त्या करारनाम्यांतल्या ज्या गोष्टी कबूल केलेल्या नाहींत, त्यांत ही एक गोष्ट आहे. तथापि, हिंदुस्थानच्या हाजी नेणाऱ्या सर्व तारवांवर दरेक हाजीबद्दल (मग तो हाजी कोणत्याही वयाचा असो) निदान १½ मीटर (१६ चौरस फूट) जागा असावी असें आह्मी ठरविणार आहोंत असें मलिका माआझमांच्या सरकारानें फ्रेंच सरकारास कळविलें आहे, आणि गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांस सदरहू ठराव अमलांत आणितां येईल अशा रीतीनें, योजिलेला मसुदा तयार करावयाचा आहे. ह्याप्रमाणें जास्त जागा द्यावी लागल्यामुळें आगबोटींच्या तिकिटांची किंमत हाजीलोकांस जास्त द्यावी लागेल ही गोष्ट सरकारास माहीत आहे तरी, ह्याप्रमाणें जास्त जागा दिली पाहिजे असें आरोग्यरक्षणसंबंधी बाबतींत ज्यांचें मत उत्तम गणलें जातें अशा मनुष्यांचें आणि तुर्की सरकार धरून ज्या युरोपियन राष्ट्रांचा ह्या बाबतींशीं संबंध आहे त्या सर्व राष्ट्रांचें मत पडल्यावरून, तशी जास्त जागा देण्याचें ठरविलें आहे.

### (ब) पाणी.

आतां अमलांत असलेल्या कानूंत असें आहे कीं, १२ वर्षांच्या व त्याहून जास्त वयाच्या दरेक हाजीस (१२ वर्षांहून जास्त वयाचें नाहीं परंतु एका वर्षाहून कमी वयाचें नाहीं अशा दरेक मुलास एक हाजी गणावयाचें व एका वर्षाहून कमी वयाच्या मुलांस मुळींच गणावयाचें नाहीं) दररोज एक ग्यालन गोडें पाणी दिलें पाहिजे; परंतु सदरहू करारनाम्याच्या शर्तींस अनुसरून, दरेक हाजीस (मग तो कोणत्याही वयाचा असो) दररोज एक ग्यालन गोडें पाणी मिळालें पाहिजे, असें ठरवावयाचें आहे.

### (क) रोगबीजाचा नाश करणारी भट्टी.

ज्या हाजी लोकांस पटकीचा वाखा झाला असेल अगर पटकीच्या स्वरूपाची हगवण लागली असेल त्यांचे कपडे व सामानसुमान शुद्ध करून घेण्यासाठीं तारवावर रोगबीजाचा नाश करणारी एक भट्टी असली पाहिजे असा एक ठराव नवीन कानूंमध्यें दाखल करण्यांत येईल. रोगबीजाचा नाश कसा करावयाचा ह्याबद्दलही त्यांमध्यें ठराव असतील.

### (ड) शेतखानें.

सन १८९० सालीं ज्या कमिटीनें देशी उतारू नेण्याआणणाऱ्या तारवांबाबद आक्टाचा अमल कसा होत आहे ह्याबद्दल चौकशी केली होती त्या कमिटीनें केलेल्या सूचनेस अनुसरून, हल्लीं दर शंभर हाजी लोकांस दोन ह्या प्रमाणानें आगबोटींवर शेतखाने असावे लागतात त्यांचें प्रमाण वाढवून ते दर शंभर हाजीलोकांस चार करावे असें, ही संधि साधून, हिंदुस्थान सरकार ठरविणार आहे. त्याचप्रमाणें दर शंभर हाजींस दोन ह्या प्रमाणानें तारवावर भंगी ठेवण्याबद्दल ठराव करण्यांत येणार आहे आणि शेतखाने जास्त चांगल्या रीतीनें साफ ठेवण्याबद्दल आणि त्यांतल्या रोगबीजाचा नाश जास्त चांगल्या रीतीनें करण्यांत यावा अशाबद्दलही आणखी ठराव करण्यांत येणार आहेत.

### (इ) हाजींच्या बरोबरचें सामान.

सदरहू करारनाम्यांत असा एक ठराव आहे कीं, हाजींबरोबरचें अवजड सामान नोंदून व त्यावर नंबर घालून तें होल्डमध्यें सांठवून ठेवावें, आणि हाजी लोकांना अगदीं जरूरीचें असेल तेवढें मात्र सामान (हें दरेक हाजीच्या बाबतींत एका मणाहून जास्त नसावें) त्यांना आपल्याजवळ ठेवूं द्यावें. हा ठराव अमलांत आणण्यासाठीं एक कानू करण्यांत येईल.

### (फ) तारवावर दररोज वैद्यकीय तपासणी करणें.

सदरहू करारनाम्यांत अशी एक शर्त आहे कीं, हाजींस तारवावर घ्यावयाच्या बंदरीं पटकीचा उपद्रव चालू असेल तेव्हां, हाजींपैकीं कोणत्याही इसमास तो उपद्रव झालेला नाहीं अशी खातरी व्हावी यासाठीं त्यांस एकत्र जमा करून त्यांची पांच दिवसपर्यंत वैद्यकीय तपासणी करण्यांत येई तोंपर्यंत, त्यांना तारवावर घेऊं नये. तथापि ब्रिटिश प्रतिनिधींनीं सांगितल्यावरून सदरहू सभेनें असें ठरविलें कीं, ही तपासणी, तारूं हिंदुस्थानांतून निघाल्यापासून तें आदन येथें पोंहोंचेपर्यंतच्या मुदतींत तारवावर केली असतां चालेल. ह्याप्रमाणें बंदोबस्त करण्यासासाठीं एक कानू करण्यांत येईल.

### (ग) हिंदुस्थानाहून निघण्याच्या आधीं दुसऱ्यानदां वैद्यकीय तपासणी करणें.

(हाजी नेणारी) आगबोट नांगर उचलून चालू लागणार त्याच्या अगदीं थोडावेळ आधीं तिच्यावरच्या हाजी लोकांची दुसऱ्यानदां वैद्यकीय तपासणी करणें इष्ट होईल कीं काय असें मलिका माआझमांचे सेक्रेटरी आफ् स्टेट ह्यांनीं सुचविल्यावरून त्यासंबंधानें स्थानिक सरकारांस विचारिलें होतें. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांनीं ह्या बाबतीसंबंधानें अशी एक कानू करण्याचें योजिलें आहे कीं, हाजी नेणारें तारूं, हाजी लोकांस वर घेतल्यावर ४८ तासांहून जास्त वेळपर्यंत बंदरांत अटकावून ठेवितां येत असेल त्या बाबतींत व त्या हाजी लोकांपैकीं कांहींस देवीचा, पटकीचा, काविळीचा, अगर कोणत्याही सांतीच्या रोगाचा उपद्रव झाला आहे असा संशय येण्यास कारण झालें असेल त्या बाबतींत, लायक अशा एका वैद्यकीय अमलदारानें ह्या हाजी लोकांची दुसऱ्यानदां वैद्यकीय तपासणी केली पाहिजे.

४. वर सांगितलेंच आहे कीं, मलिका माआझमांच्या सरकारानें सदरहू करारनाम्यांतल्या शर्तींपैकीं तीन गोष्टी कबूल केल्या नाहींत. पैकीं, जागेसंबंधाची गोष्ट सदरीं ३ (अ) पारिग्राफांत सांगितलीच आहे. दुसरी गोष्ट कबूल करण्यांत आली नव्हती तिचा संबंध इराणच्या अखातांत करावयाच्या व्यवस्थेशीं असल्याकारणानें तिच्याविषयीं येथें सांगावयाचें प्रयोजन नाहीं. सदरहू करारनाम्यांत, हाजींस तारवांवर घेण्याच्या आधीं त्यांजवळ पुरेसा पैसा असला पाहिजे अशी एक शर्त होती ती नाकबूल केलेली तिसरी गोष्ट होय. हिंदुस्थान सरकारचे ह्या बाबतीच्या संबंधाचे विचार मागेंच प्रसिद्ध झाले आहेत; हेजाजास (अरबस्थानास) करावयाची यात्रा करवेल तितकी सोपी करावी अशी त्या सरकारची पहिल्यापासून इच्छा आहे. हिंदुस्थान सरकारचे हे विचार लक्षांत आणितां, मलिका माआझमांच्या मुसलमानी प्रजेच्या धर्मसंबंधी स्वातंत्र्यावर सदरहू करारनाम्यांत दाखल केलेला निर्बंध ठेवणें रास्त होणार नाहीं असें ब्रिटिश सरकारास वाटल्यावरून त्यांनीं ती शर्त कबूल करण्याचें नाकारिलें आहे.

५. हिंदुस्थान व अरबस्थान ह्यांच्या दरम्यान हाजी लोकांस नेण्याआणण्याच्या कामावर निर्बंध ठेवण्याच्या बाबतींत युरोपियन राष्ट्रांच्या दरम्यान पारिस येथें झालेल्या करारनाम्यामुळें जे काय फेरफार करावे लागत आहेत, त्यां-

चा उद्देश, मुसलमान यात्रेकरूंस अरबस्थानास जातांना व तिकडून परत येतांना ज्या अडचणी सोसाव्यां लागतात त्यांचें निवारण व्हावें हा आहे, हें लक्षांत येईलच. तथापि, ह्यांपैकीं कांहीं फेरफारांच्या योगानें, व विशेषेंकरून जागेच्या संबंधाच्या फेरफाराच्या योगानें समुद्राच्या सफरीचा खर्च बराच वाढेल ही गोष्ट मलिका माआझमांच्या सरकारास व हिंदुस्थान सरकारास सर्वस्वी कबूल आहे. ह्मणून, पारिसच्या करारनाम्यांत सुचविलेल्या रीतीनें कामरान येथील स्थिति सुधारणें आणि कान्स्टान्टिनोपल येथील आरोग्यरक्षक मंडळानें व ज्या अमलदारांकडून वेळोवेळीं, सध्याची स्थिति सुधारण्यासाठीं काय काय उपाय करणें जरूर आहे तें तुर्की सरकारास कळविण्यांत आलें आहे त्या कर्तबगार अमलदारांनीं सुचविल्याप्रमाणें जेद्दा व मक्का येथील आरोग्यरक्षणाची व्यवस्था सुधारणें किती अवश्य आहे ह्याबद्दल तुर्की सरकारास आग्रहपूर्वक सुचविण्याची कोणतीही संधी आपण जाऊं देणार नाहीं, आणि सुलतानसाहेबांच्या सरकारानें, तें कर्तव्य करण्याच्या कामीं त्यांस मदत करण्यासाठीं चांगले कुशल अमलदार मागितल्यास तेही आपण देऊं, असें ब्रिटिश सरकारानें कबूल केलें आहे ही गोष्ट लोकांस कळविण्यास गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांना आनंद वाटत आहे. त्याचप्रमाणें ते मुसलमान लोकांस अगदीं खातरीपूर्वक असें सांगूं इच्छितात कीं, मक्केस जातांना समुद्रावरून व खुषकीवरून जो प्रवास करावा लागतो तो जास्त सुखकर होण्यासाठीं जी तजवीज करण्यांत येईल तिच्या योगानें हाजींवर विनाकारण जास्त बोजा मुळींच पडूं नये अशी त्यांची फार इच्छा आहे; आणि त्यांची अशीही आशा आहे कीं, हिंदुस्थानांतल्या हाजी लोकांस कामरान येथें जितक्या मुदतीपर्यंत कारन्टाईनमध्यें ठेवण्याची वहिवाट आहे ती मुदत तुर्की सरकाराकडून कमी करून घेतां येऊन, आरोग्यरक्षणसंबंधाचे कर हाजी लोकांकडून वसूल करून घ्यावे लागणार ते कमी करितां येतील आणि खरोखर गरीब अशा हाजीलोकांस ते कर त्या सरकाराकडून माफही करून घेतां येतील.

६. सन १८९६ च्या वसंत ऋतूंत जी यात्रा भरत असते त्या यात्रेस सदरहू मसुद्यांतले व नवीन कानूंतले ठराव लागू व्हावे ह्मणून तो मसुदा व त्या कानू तारीख १ आक्टोबर १८९५ रोजीं अमलांत आणण्याचें योजिलें आहे. हा ठराव लोकांस होईल तितका लवकर कळविण्यांत यावा अशी स्थानिक सरकारांस व आडमिनिस्ट्रेशनांस सूचना आहे.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS